




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com






वर्ष २ रे | अंक : ६५०. वा | शनिवार | दि. १३ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# सक्रिय राजकारणात सहभागी व्हा, घराणेशाही संपवा- पंतप्रधान मोदींचं युवकांना आवाहन...



**वृत्तसंस्था/ नाशिक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज नाशिकच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी नॅशनल युथ फेस्टिव्हलमध्ये युवकांना संबोधित केले. पंतप्रधान मोदी म्हणाले,ड्ड्ड आज मी नाशिकमध्ये आहे, हे मी माझे सौभाग्य मानतो. या धरतीनं टिळक सावरकरांना घडविलं. काळाराम मंदिरात सफाई करण्याचं भाग्य मिळालं, हे माझं सौभाग्य आहे. यावेळी अयोध्येत २२ जानेवारी रोजी होत असलेल्या श्री राम मंदिराच्या उद्धाटन सोहळ्यानिमित्त देशातील नागरिकांनी आपआपल्या परिसरातील मंदिराची स्वच्छता करावी असं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं. राजमाता जिजाऊंना कोटी कोटी प्रणाम म्हणत पंतप्रधान मोदींनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली. आज योगायोगनं राष्ट्रीय युवा दिनही आहे. त्यानिमित्तानं यावेळी तरुणांना पंतप्रधान मोदींनी काही मोलाचे सल्ले दिले. त्यामध्ये मोदींनी लोकल उत्पादनाला प्रोत्साहित करण्याचं आवाहन केलं. नशा ही जीवनाचा नाश करते त्यामुळे नशेपासून दूर राहण्याचा सल्ला मोदींनी दिला. विशेष म्हणजे तरुणांनी जीवनातून शिव्यांना हद्दपार करण्यांच आवाहन मोदींनी केलं. आई, मुलगी, बहीण यांच्या नावाने शिव्या देणं तरुणांनी बंद करावं असं ते म्हणाले. नाशिकमध्ये युवा महोत्सवामध्ये बोलताना मोदी पुढे म्हणाले की, आजही आपण क्रांतीकारकांची आठवण काढतो. त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करुन ठेवलं होतं. समाजाचं सशक्तीकरण करायचं असल्यास शिक्षणाला पर्याय नाही. त्यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची कास धरण्यास समाजाला शिकवलं.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नाशिकच्या ऐतिहासिक श्री काळाराम मंदिरात जावून भगवान श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेतले.यावेळी प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्या हस्ते काळाराम मंदिरात विधीवत पूजा व आरती करण्यात आली. काळाराम मंदिर संस्थानचे मुख्य महंत तसंच विश्वस्त यांच्यातर्फे पंतप्रधान मोदी यांचा भगवान श्रीरामाची चांदीची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. काळाराम मंदिराचे मुख्य महंत आचार्य महामंडलेश्वर सुधीरदास महाराज, श्री काळाराम मंदिर संस्थानचे विश्वस्त धनंजय पुजारी, मंगेश पुजारी, नरेश पुजारी, मंदार जानोरकर, एकनाथ कुलकर्णी, पं. प्रणव पुजारी, अद्वय पुजारी तसंच वारकरी आणि संत परिवारातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या समोर अभंग आणि भावार्थ रामायणातील ८ व्या अध्यायाचे (श्लोकांचे) ज्यामध्ये प्रभू श्रीराम यांचा नाशिकमधील वास्तव्याचा उल्लेख आहे, त्याचे वाचन करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात उपस्थित महंत, वारकरी आणि संत कुटुंबातील वंशज यांच्याशी मोदींनी संवाद साधला. मंदिर परिसरात असलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यास नरेंद्र मोदी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आहे.

---

## सोनेवाडी येथे संतप्त शेतकऱ्यांनी राजकीय पुढाऱ्यांना केली गावबंदी...

# घामाचं दाम देऊ शकत नसेल तर ह्या सरकारला राज्य करण्याचा काय अधिकार: शेतकरी बांधव

**जनसंचलन/ चिखली**

सोयाबीन, कापूस,तुरीचा भाव अर्ध्यावर आणला, दुष्काळी ,नापिकी, अतिवृष्टी पिकविमा कोणतेही शंभर टक्के शेतकऱ्यांना सहकार्य मिळत नसल्याने संतप्त झालेल्या सोनेवाडी येथील शेतकऱ्यांनी राजकीय पुढाऱ्यांना गावबंदीचा फलकच आज ११ जानेवारी रोजी गावाच्या प्रवेशद्वारावरच लावला आहे.या फलकातुन शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला आहे.शेतीमधुन लागवडीचा खर्च निघणे कठीण झाले आहे.भाववाढीची वाट पहात २०२४ साल आले.परंतु शेतमालाचे भाव आणखीच कमी होत चालले आहे.

शेतकऱ्यांची भावानां समजुन घेण्यासाठी कोणताही राजकीय नेता बोलायला तयार नाही.सताधाऱ्यां प्रमाणे विरोधकांनी सुद्धा या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. म्हणुन शेतकऱ्यांची भावनां दिवसेंदिवस राजकीय पुढाऱ्यांनवर आक्रोश निर्माण होत शेतकऱ्यांला कोणीही वाली नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये वाढीस लागली आहे. त्यामुळे चिखली तालुक्यातील सोनेवाडी येथील शेतकरी युवावर्ग यांनी पुढाऱ्यांना गावबंदीचा फलक लावला आहे.जर हे सरकार शेतकऱ्यांला त्याच्या घामाचा दाम देऊ शकत नसेल तर ह्या सरकारला राज्य करण्याचा काहीही अधिकार नाही. त्यामुळे सरकार विरोधात पुढारी यांच्या विरोधात गावबंदी जाहिर केलेली आहे. जर शेतकऱ्यांचा म्हणनं ऐकचं असेल तर ते संसदेत माडुंण शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे तेव्हा शेतकरी जगेल नाहीतर शेतकरी



पुढाऱ्यांना त्यांच्या ऐणाऱ्यां काळात त्यांची जागा दाखवून देईल.व संविधान मार्गाने उत्तर सरकारला देण्यात येईल असे मत सोनेवाडी येथील युवा शेतकरी समाधान जाधव यांनी सांगितले व मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.या गावातुन गावबंदीची ठिणगी पडली आहे.ती कीती वनवा पसरवते हे येणारा काळच ठरवेल.सोनेवाडी येथील शेतकऱ्यांनी गावबंदीचा फलक गावात लावला हे कळताच रायपुर पोलिस स्टेशनचे कर्मचारी यावेळी उपस्थित झाले

## श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने राष्ट्रमाता. राजमाता माँ जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/खामगाव**

स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा आज दिं १२-१-२०२४ शुक्रवार रोजी सकाळी ११ वा मंडळाच्या संस्थापक एकनिष्ठ संचालिका सौ पार्वती बाई सुकाळे यांच्या घरी राष्ट्रमाता. राजमाता माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेला कुंकुम तिलक लावून.पुष्पहार अर्पण करून विधिवत पुजन करून माँ जिजाऊ वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले या वेळी बुध्दी आणि युक्ती च्या जोरावर माँ साहेब जिजाऊंनी अशक्य ते शक्य करून दाखविले स्वराज्य निर्माण केले. स्वामी विवेकानंदानी ध्येय पुर्ती होईपर्यंत थांबु नका असा संदेश दिला महापुरुषांचे विचार व कार्य समाजाला कायम प्रेरणा देत असतात असे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा यांनी केले राजमाता माँ जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली या वेळी ते बोलत होते सर्व प्रथम मंडळाच्या संचालिका गं. भा. ईन्दूबाई गायकवाड यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली नंतर जिजाऊ वंदना घेऊन अल्पोपहार वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या प्रसंगी जेष्ठ साहेबराव सुकाळे, महादेवसर सुकाळे, भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा,गणेश पिंपळकर,विनोद सुकाळे,अरुण कडवकर,संतोष सुकाळे, दिलिप झापर्डे,सुनील श्रीवास्तव, लालाजी सांगळे, आशाबाई अंधारे, सुशिला आवलकर,पार्वतीबाई सुकाळे,मंगला बावस्कर, संगिता वाघोळे,शकुंतला ढवळे,जयाबाई सुकाळे, जयश्री झापर्डे, रजनी सुकाळे, आरती सुकाळे,मंजरी सुकाळे, भक्ती सुकाळे, धनश्री सुकाळे, भुमी सुकाळे, आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद सुकाळे यांनी केले अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रामलल्ला प्रतिष्ठापना उत्सव दिवाळी प्रमाणे साजरा करा -राधेश्यामजी चांडक

**जनसंचलन/बुलढाणा**

५०० वर्षाच्या अथक संघर्षानंतर अयोध्याधाम मध्ये हिंदुस्थानचे आराध्य दैवत मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांच्या बालस्वरूप मुर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. हजारो रामभक्त, ऋषीमुनी, कारसेवकांनी संघर्ष करून बलीदान सुध्दा दिले आहे. म्हणुन प्रत्येक भारतीयांचे हे कर्तव्य आहे की, २२ जानेवारीला होणारा प्रतिष्ठापना महोत्सव दिवाळी प्रमाणे साजरा करावा असे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी केले. सद्भावना सेवा समितीच्या सर्व कार्यकर्त्यांची मार्बलहाऊस येथे सभा घेण्यात आली. श्रीराम मारोती मंदिर संस्थानचे प्रतिनिधी सुध्दा उपस्थित होते. सभेमध्ये राजेश देशलहरा, चंपालाल शर्मा, विजय व्यवहारे, सुरेशचंद्र गट्टाणी, प्रकाशचंद्र पाठक, तिलोकचंद चांडक, मधुकर गायके, उमेश मुंधडा, नितीन जयस्वाल, सिध्दार्थ शर्मा, संजय कुळकर्णी, सुभाष दर्डा, आशुतोष वाईकर, यशवंत सुरडकर, विजय शर्मा, पुरणमल शर्मा, राजेश माधवाणी (लालाभाई), मनमोहन शर्मा इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. दि. २० जानेवारीला दुपारी ३.०० वाजता गणेश मंदिर सुवर्णनगर येथुन भव्य शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत राम-लक्ष्मण-सीता-हनुमान यांची रथामध्ये झाँकी निघणार आहे. बॅण्ड पथक, कलशधारी ५०० महिलांचे पथक, दिंडी पथक, रामधुन, श्रीरामाची भव्य मुर्ती व शहरातील रामभक्त सर्व समाविष्ट होतील. पेठेतील राममंदिर आणि सद्भावना सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शोभा यात्रेचे आयोजन केले आहे. शनिवार दि. २० जानेवारीला दुपारी ३.०० वाजता सुरु होणारी शोभायात्रा गणेश मंदिर सुवर्णनगर येथुन सुरु होवून-संगम चौक-जयस्तंभ चौक बाजार लाईन-बुलडाणा अर्बनचे मुख्यालय-कारंजा चौक आणि पेठेतील श्रीराम मारोती मंदिरामध्ये महाआरती होईल. या शोभायात्रेचे नागरीकांनी सडा, रांगोळी, स्वागत कमानी उभारून उत्स्फुर्त स्वागत करावे. घरोघरी दिप लावून आनंद साजरा करावा दिवाळीला ज्याप्रमाणे आकाशदिप व लायटींग करुन आपण साजरे करतो तसेच दि. २० ते २२ जानेवारीपर्यंत प्रत्येक कुटूंबाने



उत्सव साजरा करावा असे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित मोफत सर्वरोग चिकित्सा शिबिराला प्रतिसाद...




**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा वकिल संघाच्यावतीने राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून श्री. माऊली होमिओपॅथिक हॉस्पीटलच्या सहकार्याने आयोजित मोफत सर्वरोग चिकित्सा शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला. न्यायालयाशी संबंधित १६८ जणांची यावेळी आरोग्य तपासणी करण्यात आली. येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात १० जानेवारी रोजी न्यायाधीश, विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात श्री. माऊली होमिओपॅथिकचे संचालक डॉ. दुर्गासिंग जाधव, सौ. निलिमा जाधव तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नील थोरात यांनी सेवा दिली. एकूण १६८ जणांची यावेळी तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार त्यांना औषधींचेही मोफत वितरण करण्यात आले. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयाच्यावतीने रक्त तपासणी करण्यात आली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष स्वप्निल खटी हे होते. प्राधिकरणाचे सचिव व दिवाणी न्यायाधीश वरीष्ठस्तर एच. एस. भुरे, प्रथम वर्ग जिल्हा न्यायाधीश आर. एन. मेहरे, जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. विजय सावळे, डॉ. दुर्गासिंग जाधव, डॉ. सौ. निलिमा जाधव, डॉ. स्वप्नील थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राधिकरणाच्यावतीने वैद्यकीय तज्ञांचा यावेळी स्मृतीचिन्ह , प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ व वृक्ष देवून सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. दुर्गासिंग जाधव यांनी विधी व्यवस्थेत काम करणाऱ्या व्यक्तींना सतत अभ्यासात व्यस्त आणि दक्ष रहावे लागत असल्याने त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परिणामी त्यांच्यामध्ये मधुमेह, उच्चरक्तदाब आणि थॉयराईडचे आजार मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. शिबिराच्या माध्यमातून यासंबंधीचे मार्गदर्शन व औषधोपचार करण्यात येणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. यावेळी न्यायाधीश स्वप्निल खटी, ॲड. विजय सावळे व डॉ. स्वप्निल थोरात यांनीही मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राधिकरणाचे एम. डी. जोशी, संजय जाधव, पवनकुमार अय्यर यांच्यासह वैद्यकीय कर्मचारी रवी शेवाळे, प्रेमसिंग मोरे, हितेश पाटील, ज्ञानेश्वर पवार व जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांची काळाकोट येथील शस्त्रप्रदर्शन, रंगमहालला भेट...

## लखोजी राजे जाधव यांच्या समाधीस्थळी अभिवादन...

**जनसंचलन/बुलडाणा**

राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीदिनी पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी आज येथील काळाकोट परिसरातील शस्त्रसंग्रहालयातील शिल्प आणि शस्त्र प्रदर्शन, रंगमहालला भेट देत पाहणी केली. तसेच राजे लखोजी जाधव यांच्या समाधीस्थळी जावून अभिवादन केले. आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपवनसंरक्षक श्रीमती सरोज गवस, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे, अभिरक्षक अमृत पाटील यावेळी उपस्थित होते.

दगडी शिल्प व शस्त्रास्त्रे प्रदर्शनात १० ते १३ व्या शतकापासून सापडलेले दगडी शिल्प, शस्त्रांचे अभिरक्षण, संवर्धन करण्यात आले असून, त्यामध्ये उमा महेश्वर, इंद्राणी, शंकर पार्वती शिल्प, नृत्य गणेश, शिवपार्वती, मकर मुख, विरगल, अश्विनी, लक्ष्मीनारायण, वैष्णवी, मुरलीधर कृष्ण, किचक शिल्प, भैरव, ब्राहमी, वराह अवतार, जाते, विष्णू, द्वारपाल, मयुरी, माहेश्वरी, चामुंडा मूर्ती, गरुड प्रतिमा आदि शिल्पकृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. तर शस्त्रास्त्र प्रदर्शनात तलवार, मराठा कट्यार - हलदाई, अमुक्त शस्त्र, स्त्रियांच्या कट्यारी, विजयनगरी कट्यार, जरनाळ, खैबर,



संगीन, अंकुश, इराणी भाले, पेशकब्ज, जंबिया, खंडा तलवार, दांडपट्टा, मराठा तलवारी, पदकुंत, गजकुंत, अश्वकुंत,विटा, फरशी कु-हाड, दगडी, पोलादी तोफगोळे, कर्द, खंजराली, बिचवा, कुकरी, वाघनखं, मुघल कट्यार आदिंचे प्रदर्शन भरले आहे. तसेच मानकरी तलवार, ब्रिटीश तलवार, समशेर, मुगल तलवार, गुर्ज, जमदाड तलवार, राजपुत तलवार, पट्टीसा, निमचा तलवार, नायर तलवार, दमास्कस पोलादाची राजपुत तलवार, तेगा तलवार, गेंड्याच्या कातडीची ढाल, फेन्सींग तलवार, शिरस्त्राण, दरस्त्राण, खोगीर आणि चिलखतींचा प्रदर्शनात समावेश आहे. या प्रदर्शनाला नागरिक मोठ्या संख्येने भेट देत आहेत.

वास्तुविशारद स्वप्नील श्रॉफ, ऐतिहासिक शस्त्रास्त्र संग्राहक निलेश सकट यांनी पालकमंत्र्यांना प्रदर्शनाबाबत माहिती दिली. पालकमंत्री श्री. वळसे पाटील यांनी रंगमहालाला भेट दिली असता, सहायक संचालक अमोल गोटे रंगमहाल संवर्धनाबाबत माहिती दिली.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डॉ.पंजाबराव देशमुख यांची १२५ व्या जयंती निमित्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने मिलेट दौडचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा** : देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२५ व्या जयंतीनिमित्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३च्या अनुषंगाने मिलेट दौडचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही दौड पार पडली. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत जायभाये, सहायक प्राध्यापक डॉ. दिनेश कानोडे, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे श्री. ढवळे, कृषि उपसंचालक कु. एस. आर. कणखर, उपविभागीय कृषि अधिकारी डी. बी. सवडतकर, बाळासाहेब व्यवहारे, अंबादास मिसाळ उपस्थित होते. सध्याच्या जीवनशैलीत सर्वच वयोगटातील लोकांच्या विशेषतः विद्यार्थ्यांच्या आहारातील पौष्टिक तृणधान्य पदार्थांचा वापर कमी होत आहे. परिणामी आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. जिल्ह्यात पौष्टिक तृणधान्याच्या उत्पादनात वाढ करणे व लोकांमध्ये पौष्टिक तृणधान्यामधील गुणधर्माविषयी जागरूकता निर्माण करून दैनंदिन आहारात त्यांचा समावेश करण्यासाठी कृषी विभागामार्फत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त मिलेट दौड आयोजित केली होती.

कृषि विभागामार्फत विविध उपक्रम गावोगावी राबविण्यात येत असून, मिलेट दौड जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा सत्र न्यायालय, कारंजा चौक, भोंडे सहकार चौक, तहसील कार्यालय, संगम चौक, जिजामाता प्रेक्षागार ग्राउंड या मार्गाने काढण्यात आली. जिजामाता प्रेक्षागार ग्राउंड येथे मिलेट दौडचा समारोप करण्यात आला.

जिल्ह्यातील सर्व तालुका कृषि अधिकारी



व कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते. एडेड महाविद्यालय व ज्युनिअर कॉलेज, डॉ. राजेंद्र गोडे कृषि महाविद्यालय, श्री. शिवाजी ज्युनिअर कॉलेज व भारत विद्यालय येथील शिक्षक वृंद व विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे नियोजन सुवर्णा आदक, मयुरी खलाणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बुलडाणा जिल्हा दौ-यावर...



**जनसंचलन/बुलढाणा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्या, शनिवार (दि.१३) रोजी एकदिवसाच्या बुलडाणा जिल्हा दौ-यावर येत आहेत. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे दुपारी ३:१० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जाफ्राबाद रोड, चिखली येथील हेलिपॅडवर आगमन होईल. त्यानंतर दुपारी ३:१५ वाजता चिखली येथील शिवसंकल्प अभियान - कार्यकर्ता मेळावा सभास्थळी त्यांचे मोटारीने आगमन होईल. सायंकाळी ४:३० वाजता ते सभास्थळ येथून मोटारीने जाफ्राबाद रोड, चिखली हेलिपॅडकडे प्रयाण करतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सायंकाळी ५:१५ वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# सिंदखेडराजा विकास आराखडा वेगाने पूर्ण करणार वन, सांस्कृतिक कार्य मंत्री - सुधीर मुनगंटीवार राजमाता जिजाऊ यांच्या टपाल तिकीटाचे अनावरण....

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा ही भूमी स्वराज्याची प्रेरणा देणारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची ही जन्मभूमी आहे. या भूमीचा विकास करणे हे राज्य शासनाचे आद्यकर्तव्य आहे. यासाठी २६० कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. हा आराखडा वेगाने पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त टपाल तिकीटाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, ॲड. आकाश फुंडकर, श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोस्ट मास्तर जनरल अदनान अहेमद आदी उपस्थित होते. श्री. मुनगंटीवार म्हणाले, विकास आराखडा मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी वेगाने प्रक्रिया करण्यात येत आहे. मात्र विकासकामे सुरू झाल्यानंतर नागरिकांनी यास विरोध करू नये. विकासकामांना सहकार्य करण्याची भूमिका नागरिकांनी घेतल्यास अधिक योग्य होईल. ही कामे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होण्यासाठी लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी सजगता बाळगावी. जिजाऊ मातेने छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व घडविले. त्यांच्या विचारानुसारच राज्य कारभार चालविण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. पालकमंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले, राज्याचा कारभार महान व्यक्तींच्या विचारावर सुरू आहे. त्यांच्या विचारांची जोपासना करण्याबरोबरच त्यांच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यात येत आहे. शासन यास विशेष प्राधान्य देत आहे. विकास कामे वेगाने पूर्ण केली जातील. जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्रांचा विकास होण्यास मदत होईल.



यावेळी आमदार डॉ. शिंगणे यांचे समयोचित भाषण झाले. रामदास कुरंगळ यांनी पोवाडा सादर केला. छगन झोरे लिखीत ङ्गराजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले जन्माला यावे पुन्हाफ आणि दैनिक सकाळतर्फे प्रकाशित विशेष पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तत्पुर्वी श्री. मुनगंटीवार यांनी राजमाता जिजाऊं यांच्या जन्मस्थळी जाऊन अभिवादन केले.

# जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा अंत्री खेडेकर येथे जिजाऊ जन्मोत्सव साजरा

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील अंत्रीखेडेकर येथील जिल्हा परिषद शाळा अंत्रीखेडेकर येथे १२जानेवारी रोजी सकाळी जिल्हा परिषद शाळा अंत्रीखेडेकर येथील पटगना मध्ये जिजाऊ जन्मोत्सव साजरा करण्यात आला यावेळी जिल्हा परिषद मराठी शाळा अंत्री खेडेकर येथील विद्यार्थिनी जिजाऊ च्या वेशभूषा शाळेमध्ये आले होते तर जिजाऊंच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण मुलींनी व मुलांनी केले त्यामध्ये आपल्या वयाच्या मानाने ज्यांनी आपले विचार जिजाऊ विषय प्रखर व स्पष्ट विचार मांडले त्यांना शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने बक्षीस सुद्धा देण्यात आले आहे तसेच ज्यांनी सहभाग घेतला त्यांना पेन्सिल व खोड रबर शाळेच्या वतीने देण्यात आले आहे यावेळी शिक्षक वृद्ध ज्ञानेश्वर खेडेकर सुभाष खेडेकर राऊत सर लहाने सर परिहार सर चेके सर शाळा व्यवस्थापन समिती मुली अध्यक्ष इंद्रजीत खेडेकर बबन पवार पंजाब खेडेकर बारीकराव खेडेकर आरीफ सर अंगणवाडी मदतनीस व पत्रकार एकनाथ माळेकर या सह अनेक गावातील प्रतिष्ठित व्यक्ती जिल्हा परिषद शाळेमध्ये हजर होते यावेळी परिहार सर चेके सर यांनी जिजाऊ जीवनावर प्रकाश टाकणारे विचार मांडले तर वर्ग तिसरी व चौथी च्या मुला मुलांनी सुद्धा जिजाऊ जीवनावर प्रकाश टाकणारे विचार मांडले त्यामध्ये वर्ग चौथीची विद्यार्थिनी कुमारी स्वराली एकनाथ माळेकर वर्ग ४था हिने प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सुभाष खेडेकर यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस दिले आहे तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षक श्री राऊत सर यांनी केले आहे



# राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची जयंती बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरी...

## राजमाता जिजाऊ जयंतीदिनी पालकमंत्र्यांकडून अभिवादन

## राजमाता जिजाऊंचा विचार पुढे नेणार-पालकमंत्री दिलीप वळसे पाटील

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता मा जिजाऊंचा ४२६ वा जयंती सोहळा मोठ्या थाटामाटा साजरा करण्यात येत आहे. आज पहाटे सहा वाजता जिजाऊंचे वंशज, नगरपरिषद, जिल्हा परिषद प्रशासन आणि मराठा सेवा संघाकडून विधिवत पूजा करून जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याला सुरुवात करण्यात आली आहे. आज सिंदखेड राजा नगरीत राज्यभरातून मोठ्या संख्येत जिजाऊ भक्त दाखल होणार आहेत.

राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रेरक आहेत. त्यांच्या विचारावरच राज्याची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. त्यांचा विचार पुढे नेण्यात येणार आहे, असे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले. श्री. पाटील यांनी राजे लखोजीराव जाधव राजवाडा येथे राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळी जयंतीदिनी अभिवादन केले. यावेळी खासदार प्रतापराव जाधव, आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, नगराध्यक्ष सतिश तायडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार आदी उपस्थित होते. राजमाता जिजाऊंना अभिवादन केल्यानंतर श्री. पाटील यांनी राज दरबाराची पाहणी केली. याठिकाणी राजे लखोजी जाधव यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी परिसराची पाहणी केली. त्यानंतर श्री. पाटील यांच्या हस्ते नगर पालिकेच्या



इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगर पालिकेच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

बुलढाणा शहरात बुलढाणा विधानसभेचे आमदार संजय गायकवाड यांनी माँसाहेब यांच्या जयंती निमित्त महाआरतीचे आयोजन केले होते. हजारोंच्या संख्याने महिला तसेच पुरूष बांधव या महाआरतीला उपस्थित होते. बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक येथे महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व महिला या भगवा फेटा बांधून या महाआरतीला उपस्थित राहिल्या होते. सर्व प्रथम माँसाहेब यांच्या प्रतिमेचे व बाल शिवाजी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.त्यानंतर महाआरतीला सुरूवात करण्यात आली. मोठ्या संख्याने लोक या आरतीला उपस्थितीत होते.



तसेच माँ साहेब जिजाऊ जन्मोत्सव निमित्त जिल्हा परिषद आ-वारात स्वच्छता अभियान राबविण्यात आली.त्यांनतर सकाळी ८ वाजेच्या सुमारास बाईक रॅली काढण्यात आली तर ९ वाजेच्या सुमारास प्रशासकीय इमारत येथे राजमाता जिजाउ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पुजन व मानवदंना तसेच स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेस पुष्पहार व पुजन करण्यात आले आहे. सकाळी जिल्हा परिषद आवारात रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आले आहे. व सकाळी ११ वाजेच्या सुमारास श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुलढाणा जिल्ह्यात माँसाहेब यांच्या जयंती निमित्त भगवमय वातावरण दिसून आले आहे. मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली आहे.


मराठा महिला अर्बन

को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा.marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)

मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


# एका व्यक्तीसाठी देवासोबत खेळ, रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमावरुन काँग्रेसची मोदींवर टीका

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

अयोध्येतील राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचा राजकीय कार्यक्रमच आहे, याचा काँग्रेसने शुक्रवारी पुनरुच्चार केला. प्राणप्रतिष्ठेसाठी २२ जानेवारी ही तारीख सरकारने कोणत्या पंचांगातून घेतली, असा सवाल करताना, हा केवळ एका व्यक्तीच्या राजकीय हेतूसाठी देवासोबत चालविलेला खेळ आहे, अशी कठोर टीका काँग्रेस नेते पवन खेरा यांनी केली.





चारही शंकराचार्यांनी अपूर्ण मंदिराचा प्राणप्रतिष्ठा अभिषेक करता येत नाही, असे स्पष्ट म्हटले आहे. ही प्राणप्रतिष्ठेची तारीख कोणत्या पंचांगातून तयार करण्यात आली आहे? निवडणुकीचे निरीक्षण करून तारीख निवडण्यात आली, हे स्पष्ट आहे. राजकीय तमाशासाठी एका माणसाला देवाशी खेळताना आपण पाहू शकत नाही. राजकीय कार्यक्रमात मी आणि माझा देव यांच्यात राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मध्यस्थ म्हणून काम करतात, हे आम्ही खपवून घेण-ार नाही. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमामध्ये व्हीव्हीआयपींना प्रवेश देणारा भाजप कोण? ही एक राजकीय घटना असून, हा काही धार्मिक कार्यक्रम नाही, असे टीकास्त्र खेरा यांनी सोडले. शंकराचार्यांच्या पत्रावरही खेरा यांनी प्रश्न उपस्थित केले. एका पत्रावर व्यवस्थापकाची, तर दुसऱ्या पत्रावर स्वीय सचिव यांची स्वाक्षरी आहे. दुसरीकडे खुद्द शंकराचार्यांचा व्हिडिओ सर्वांनी पाहिला आहे. यावरून भाजपचा आयटी सेल किती भीषणतेने सक्रिय आहे हे दिसून येते, असेही खेरा म्हणाले.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958